**शपथेवर सुरु**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ६ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो.कॉ.३/ शाम बाबासाहेब गुंजाळ,

वयः – ३० वर्षे,

नेमणुक. – शेवगाव पोलिस स्टेशन, ता. शेवगाव. जि.अ.नगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः–**

दि.०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी माझी गुन्हे प्रकटीकरण म्हणून ड्युटी होती. त्यादिवशी सायंकाळी ०६.३० च्या सुमारास मी पोलीस स्टेशनला असतांना पोलीस निरीक्षक श्री. क–हे साहेब यांना मोबाईलवर एक तलवार हातात घेवून ठेवलेला फोटो आला. त्यानंतर त्यांनी मला, पो.हे.कॉ. श्री. गिते, पो.ना. राहूल यादव, पो.कॉ. अंबादास गिते व पो.कॉ. पालवे यांना खात्री करण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही हारूण शेख या इसमाच्या घरी गेलो. आम्ही त्याला स्टेटसला ठेवलेली तलवार कुठे आहे असे विचारले. त्यानंतर तो आम्हाला म्हणाला की, मी तलावार घेवून पोलीस स्टेशनला येतो. त्यानंतर हारूण शेख १० ते १५ मिनिटांनी पोलीस स्टेशनला तलवार घेवून आला. पो.हे.कॉ. गिते यांनी पंचनामा केला. नंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **निशाणी क्र. ३९** देण्यात येते. आरोपीने पोलीस स्टेशनला आणून दिलेली तलवार मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला एम.ओ. – अ वरील तलवार दाखविण्यात आली. ती तिच आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे. बी. इनामदार यांचेमार्फत सुरु–**

२. नेवासा शहरात मी चार ते पाच वर्षे नोकरी केली. मी नेवासा येथे कार्यरत होतो त्यावेळी प्रकटीकरण शाखेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवासा शहराची ब–यापैकी माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा शहरात शांतता राहावी म्हणून शांतता कमिटी स्थापण केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, शांतता कमिटीमध्ये नेवासा शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी, वकिल व डॉक्टर इत्यादी लोक असतात. हे म्हणणे खरे आहे की, ब–याच वेळा शांतता कमिटी व पोलीस डिपार्टमेंट यांच्यामध्ये वाद होण्याची शक्यता असते. क–हे साहेबांनी आम्हाला लेखी आदेश दिला

नव्हता. आम्ही तपासाला जातेवेळी स्टेशन डायरीला नोंद केली होती. नेवासा पोलीस स्टेशन ते नाईकवाडी मोहोल हे ७००–८०० मिटर अंतर आहे. नेवासा पोलीस स्टेशन पासून नाईकवाडी मोहोल येथे दुचाकी गाडीने जाण्यासाठी पाच मिनिटे वेळ लागतो. घटनास्थळी आम्ही खाजगी वाहनाने गेलो होतो. खाजगी वाहनाचा क्रमांक मला सांगता येणार नाही.

३. मी हारूण शेखचे घर पाहिले होते. आरोपीच्या घराचा दरवाजा कोणत्या दिशेस आहे हे मला सांगता येणार नाही. आरोपीच्या घराच्या आजूबाजूला झाडी नाही. हे म्हणणे खरे आहे की, तलवार जवळ बाळगने हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आरोपी तपासी अधिकारी यांच्या परिचयाचे असल्याने आरोपीला आम्ही सोबत घेवून आलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शांतता कमिटीचे सदस्य असल्यामुळे आम्ही त्यास सोबत आणले नाही. पंचांची पुर्ण नावे मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमालासारख्या तलवारी पोलीस स्टेशनला इतर गुन्ह्यातील मुद्देमाल म्हणून पडलेल्या असतात. हे म्हणणे खरे नाही की, अशा तलवारी बाजारात मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, हारूण शेख हा गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती असल्यामुळे व तो शांतता कमिटीचा सदस्य असल्याने त्याचे व पोलीसांचे वाद होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–

(**ए.एन.सरक**)

दिनांक–२२/०१/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,

नेवासा